महासत्ता

# तीन स्वायत्त महाविद्यालयांना 'अधिकारप्रदत्त' दर्जा

**कोल्हापूर ता.१ (प्रतिनिधी)**

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या तीन स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्यात आला आहे. या महाविद्यालयांना विद्यापीठ व महाविद्यालयाची एकत्रित पदवी प्रदान करता येऊ शकणार आहे.

विद्यापरिषदेच्या शिफारशींवरून व्यवस्थापन परिषदेने नुकताच तीन स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्रदान केला. यामध्ये दत्ताजीराव कदम टेक्नीकल एज्युकेशन सोसायटीचे टेक्स्टाईल ण्ड इंजिनिअरींग इन्स्टिट्यूट (इचलकरंजी), विवेकानंद महाविद्यालय (कोल्हापूर)आणि राजारामबापू इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी (साखराळे, जि. सांगली) यांचा समावेश आहे.

पुढारी

# विद्यापीठाकडून आजअखेर २३५ पदवी अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवीच्या २३५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेतंर्गत सोमवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ आर्टस्, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ ॲग्रीकल्चर, बी.एड., एम.एड., बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग, मास्टर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ एज्युकेशन, बॅचलर ऑफ व्होकेशन आदी १९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या. परीक्षेला १९७२ विद्यार्थी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठातून

दरम्यान, सोमवारी एम.एस्सी. (इंडस्ट्रीयल केमेस्ट्री), बीएसडब्ल्यू, बी.व्होक., डिप्लोमा इन मेडिकल लॅब टेक्निशियन आदी सहा अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले. परीक्षेसाठी विद्यापीठाने नेमलेल्या भरारी पथकाकडून कोल्हापूर (१), सातारा (७) जिल्ह्यातून ८ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीने केली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

0 4 JUL 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ७० परीक्षांचे मूल्यमापन सुरू; २३५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

# पावणेदोन लाख विद्यार्थ्यांची परीक्षा संपली

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या १ लाख ९० हजार विद्यार्थ्यांची परीक्षा संपली आहे. उर्वरित ६० हजार विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने सोमवारपर्यंत एकूण २३५ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत. विविध ७० परीक्षांच्या मूल्यमापनाचे काम सध्या सुरू आहे.

विद्यापीठाने मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रामध्ये एकूण ६०० परीक्षांचे नियोजन केले आहे. त्यातील पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा २५ मे पासून सुरू झाल्या. ऑफलाईन वर्णनात्मक



स्वरूपात विविध सत्रांमध्ये परीक्षा घेण्यात येत आहेत. त्यात परीक्षा मंडळाने २३५ अभ्यासक्रमांच्या १ लाख ९० हजार विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर केले आहेत. त्यात बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., लॉ आदी अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. उर्वरित २०० परीक्षा होणार असून, सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत उन्हाळी सत्रामधील या परीक्षा चालणार आहेत. सध्या बी. एड., एम. एड., सीईटीअंतर्गत प्रवेश होणाऱ्या काही अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या मूल्यमापनाचे काम कॅप सेंटरमध्ये सुरू आहे.

> विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरळीतपणे सुरू आहेत. पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्यानंतर त्यांचा विहित मुदतीमध्ये निकाल जाहीर करण्यात येत आहे. परीक्षा घेणे, मूल्यमापन करणे या प्रत्येक टप्प्यावरील कामाचे नियोजन केले आहे.
>
> **-डॉ. अजितसिंह जाधव**, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

### 'कॉपी' करताना आठ विद्यार्थी सापडले

■ बी. टेक., एम. ए., एम. बी. ए., बॅचलर ऑफ व्होकेशन डिप्लोमा इन मेडिकल लॅबरोटरी टेक्नॉलॉजी, असा विविध ११ अभ्यासक्रमांच्या परीक्षा आज झाल्या. त्यासाठी १९७२ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेदरम्यान विद्यापीठाच्या भरारी पथकाने केलेल्या कारवाईमध्ये आठ विद्यार्थी कॉपी करताना सापडले. त्यात सातारा जिल्ह्यातील सात, तर कोल्हापूर जिल्ह्यातील एका विद्यार्थ्याचा समावेश आहे. त्यांच्या परीक्षा प्रमाद समितीतर्फे कारवाई केली जाणार आहे.

तरुण भारत

# विद्यापीठ अंतर्गत २३५ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झालेल्या परीक्षापैकी २३५ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत. सोमवारी झालेल्या १९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. १ हजार ९७२ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. गैरप्रकार रोखण्यासाठी विद्यापीठाने भरारी पथकांची नियुक्ती केली आहे. सोमवारी कोल्हापूर एक व सातारा सात असे आठ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली आहे.